अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# जनतेला भ्रष्टाचार, महागाईपासून स्वातंत्र्य नाही

देशाचे १५ वे पंतप्रधान म्हणून विराजमान झालेल्या नरेंद्र मोदींच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणाकडे सगळ्या देशाचे लक्ष लागून होते.जवळपास पन्नास ते पंचावन्न मिनिटे भाषण केलेल्या नरेंद्र मोदींनी लोकांची निराशा जरी केली नसली तरी अपेक्षाही पूर्ण केली नाही असे म्हणावे लागेल. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच पूर्ण बहुमत मिळालेल्या विरोधी पक्षाचा नेता पंतप्रधान झाला.आणि त्यांचे लालकिल्ल्यावरचे भाषण म्हणजे सामान्य माणसाच्या अपेक्षांची पूर्तता ठरेल, असे वाटत होते. त्यांचे हे पहिलेच भाषण असल्यामुळे सगळ्यांमध्येच विशेष आकर्षण निर्माण झाले होते. भाषण म्हणून विचार केला तर त्यांचे निश्चितच कौतुक करता येईल.परंतु गेल्या तीन महिन्यातला त्यांचा कारभार आणि आताचे भाषण यामध्ये कुठेतरी त्रुटी आहेत असे जाणवल्याशिवाय राहात नाही.'नेक इरादे पर अधुरे वादे' असेच त्यांच्या भाषणाचे वर्णन करता येऊ शकते. नरेंद्र मोदींच्या भाषणामध्ये निश्चितच प्रामाणिकपणा होता. त्यांना देशामध्ये नवीन काहीतरी घडावे, गरिबी दूर व्हावी, महिलांवरचे अत्याचार थांबावेत देशाचा लौकिक वाढवण्याच्या दृष्टीने स्वच्छतेला प्राधान्य मिळावे, केंद्र आणि राज्य यांच्यातील संबंध अधिक सुदृढ व्हावेत, देशातला जातीयवाद व सांप्रदायिकता नष्ट व्हावी. असे प्रामाणिकपणे वाटते आहे. देशाचा विकास घडवायचा असेल तर इथल्या तरुणांना रोजगार मिळावा, बाहेर गेलेल्या तरुणांनी किंवा उद्योजकांनी भारतात येऊन व्यवसाय सरू करावा, माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक गोष्टी कमीत कमी खर्चात अधिकाधिक वेगाने घडाव्यात यासाठी त्यांनी काही घोषणाही केल्या. माहिती तंत्रज्ञानाच्या आधारावर ईगव्हर्नन्स सुरू करून त्यांना डिजीटल गव्हर्नन्स आणायचा आहे. परदेशातल्या भारतीयांनी भारतात यावे यासाठी त्यांनी 'कम अँड मेक अॅन इंडिया' अशी घोषणा त्यांनी केली.देशातल्या गरिबाच्या बँक खात्यात तातडीच्या मदतीसाठी म्हणून एक लाख रुपये विमा संरक्षण देणारी जनधन योजना त्यांनी जाहीर केली.अशा आणि स्वातंत्र्यापासून अस्तित्वात असलेली नियोजन आयोग ही संस्था बरखास्त करून त्याठिकाणी राष्ट्रीय विकास सुधारणा परिषद ही नवी व्यवस्था निर्माण करण्याचे त्यांनी जाहीर केले आहे.या सगळ्या मुद्द्यांमधून त्यांना विकासाचे नवे मॉडेल आणण्याची प्रामाणिक इच्छा दिसून येते. प्रश्न एवढाच येतो की, या घोषणांची अंमलबजावणी होईलही. परंतु त्याचा थेट सामान्य माणसाला लाभ कसा पोहचवणार.

### नव्या घोषणांची नवी कबुतरे

आम्ही यापूर्वीसुध्दा अनेकवेळेला म्हटले आहे की, या देशाच्या विकासाचे गाडे कुठे अडत असेल तर ते दोन गोष्टींमुळेच रखडते. एक म्हणजे परखड राष्ट्रीयत्वाचा अभाव आणि महारोगासारखा पसरलेला भ्रष्टाचार जोपर्यंत या दोन गोष्टींवर लक्ष केंद्रित केले जात नाही, तोपर्यंत कोणतेही सरकार आले आणि कितीही योजनांची घोषणा केली तरी त्याचा सामान्य माणसापर्यंत लाभ पोहचणार नाही. खरे तर लालकिल्ल्यावरच्या त्यांच्या या भाषणातून भ्रष्टाचार महागाई याविरुध्द अधिक प्रभावी योजनांची अपेक्षा होती.कारण या दोन गोष्टींमुळे सामान्य माणूस अक्षरशः गांजलेला आहे. आणि भ्रष्टाचाराने तो रोज लुटला जात आहे. स्वत: मोदी यांनीच आपल्या भाषणात ते मान्य केले. सरकारी कर्मचारी काम करताना त्यातून मला काय मिळेल अशी अपेक्षा ठेवतात. आणि ती जर पूर्ण झाली नाही तर मग मला काय त्याचे असे सांगून कामे करीत नाहीत. हे जर नरेंद्र मोदींना माहीत आहे, तर मग हा भ्रष्टाचार नाहीसा करण्याच्या दृष्टीने त्यांनी लालकिल्ल्यावरून तितकीच कठोर घोषणा करणे अपेक्षित होते. चार महिन्यांपूर्वीची निवडणूक प्रचारांमधली त्यांची भाषणे त्यांनाच पुन्हा एकदा ऐकवली तर आपण जे काही बोललो होतो, त्यापैकी आपण काय काय करायला सुरुवात केली आहे हेही त्यांच्या लक्षात येऊ शकेल. देशातला भ्रष्टाचार आणि महागाई नष्ट करायची असेल तर लोकांनी काँग्रेसमुक्त भारत निर्माण करावा आता केंद्रातील सत्ता काँग्रेसच्या हातात नाही भाजपाला पूर्ण बहुमत देऊन लोकांनी सत्तेची संधी दिलेली आहे. अशावेळी लोकांना भ्रष्टाचार आणि महागाईमुक्त भारत देण्याचे काम मोदी करतील अशी अपेक्षा होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे लालकिल्ल्यावरच्या आपल्या पन्नास मिनिटांच्या भाषणात त्यांनी एका शब्दानेही भ्रष्टाचार किंवा महागाईचा साधा उल्लेखही केली नाही. लोकांना स्वातंत्र्यदिनाच्या या मुहूर्तावर भ्रष्टाचार आणि महागाईपासून स्वातंत्र्य हवे होते.ते देण्यात मोदी अपयशी ठरले, असा त्याचा अर्थ निघतो. निवडणुकीतल्या तब्बल चारशे भाषणांमधून त्यांनी भ्रष्टाचार आणि महागाई याचा पाढा वाचला होता. लोकांना त्यांच्या या आश्वासनावर विश्वास वाटला. म्हणून लोकांनी मोदींना अक्षरशः डोक्यावर घेतले. पण आज यात भ्रष्टाचार आणि महागाईविषयी त्यांनी उल्लेख करू नये, हा मतदारांचा सामान्य जनतेचा विश्वासघात समजायचा का? असा प्रश्न निर्माण होतो. 'अच्छे दिन आने वाले है' या त्यांच्या प्रसिध्द वाक्याचाही त्यांना विसर पडला. याचे त्यांनी नुसते स्मरण जरी ठेवले असते तरी लोकांना दिलासा मिळाला असता.परंतु, मागच्या घोषणा मागे ठेवायच्या. आणि नव्या घोषणा करून लोकांचे लक्ष वळवायचे. ही काँग्रेसी पध्दत ते जर अवलंबणार असतील तर कोणतेही परिवर्तन घडण्याची सुतराम शक्यता उरत नाही.कारण लोकांना अपेक्षित या मूलभूत प्रश्नांचे त्यांनी जाणीवपूर्वक विस्मरण केलेले दिसते.आणि घोषणांची नवी कबुतरे सोडून जुनाच पिंजरा कायम ठेवलेला दिसतो.

### नेक इरादे अधुरे वादे

आम्ही सुरुवातीलाच म्हटले की, त्यांचे नेक इरादे आहेत. प्रत्येक खासदार आणि आमदाराने आपल्या निधीतून दरवर्षी एक आदर्श गाव तयार करावे ही त्यांची योजना स्वागतार्ह आहे. योजना आयोगाचा पांढरा हत्ती इतिहासजमा करण्याचे धोरणही योग्य ठरते. महिलांना समान न्याय मिळण्याची त्यांची इच्छादेखील प्रामाणिक वाटते. परंतु हे सगळे करण्यासाठी जी एक प्रखर राष्ट्रीयता लागते ती निर्माण करण्यासाठी भ्रष्टाचाराचे निर्मूलन अत्यंत गरजेचे ठरते. आतापर्यंत लोकप्रतिनिधी फक्त संसद विधिमंडळामध्ये प्रश्न मांडण्याचे काम करीत होते. त्यांना अधिक कृतिशील बनवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे, त्याचे आम्ही स्वागत करतो. परंतु सामान्य जनता ज्या महत्त्वाच्या समस्यांनी गांजली आहे तो भ्रष्टाचार दूर करणे, काळा पैसा भारतात आणणे याकडे जर ते दुर्लक्ष करत असतील तर मनमोहन सिंग गेले, मोदी आले एवढाच त्याचा अर्थ होईल.